महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३९४/२००२२ दिनांक : २५.११.२०२०

प्रति,
सर्व मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
परिमंडळ कार्यालय.

**विषय:** कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांचे कामाचे तास व मार्गदर्शक सुचनांबाबत...

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष, कार्यालयीन आदेश क्र. १२ दि. ०३.०८.२०१० अन्वये तंत्रज्ञ (तांत्रिक सहाय्यक) हे पद रद्द करून **"कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक"** हे पद शहर कक्ष (Urban Unit) कार्यालयाच्या आस्थापनेवर मंजुर केलेले आहे. सदरचे पद म.रा.वि.वि.कं. मर्यादीत सेवाप्रवेश विनियम २००५ याला सुधार पत्र क्र. २७ दि. १२.०८.२०१० नुसार **"अतांत्रिक"** आस्थापनेवर वर्ग ४ मध्ये समाविष्ठ केलेले आहे.

२. सदर बाबतीत क्षेत्रीय कार्यालयांमध्ये "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" या पदा विषयी विविध प्रकारचा संभ्रम झाल्याचे आढळून आले आहे. "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" यांच्या सेवा शहर कक्ष (Urban Unit) कार्यालयाच्या आस्थापनेसाठी वापर करीत असताना पुढील बाबींचा विचार करण्यात यावा.

क) कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यकांच्या कामाचे निश्चित स्वरुप ठरविण्यात आलेले नाही त्यामुळे मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष यांचे कार्यालयीन आदेश क्र. १२ दि. ०३.०८.२०१० अन्वये तंत्रज्ञ (तांत्रिक सहाय्यक) हे पद रद्द करून कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक (अतांत्रिक सहाय्यक) हे पद कार्यालयाच्या आस्थापनेवर मंजुर केले आहे. सबब, म.रा.वि.वि.कं. मर्यादीत सेवाप्रवेश विनियम २००५ याला सुधार पत्र क्र. २७ दि. १२.०८.२०१० नुसार सदर पद 'अतांत्रिक' आस्थापनेवर वर्ग ४ मध्ये समाविष्ठ केलेले आहे. त्यानुसार कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक (अतांत्रिक सहाय्यक) यांना अतांत्रिक स्वरुपाचे काम देण्यात यावे.

ख) कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यकया अतांत्रिक पदाचे कामकाजाचे तास म.रा.वि.वि.कं. मर्यादीत सेवाप्रवेश विनियम २००५ याला सुधारपत्र क्र. ४९ दि. २७.०२.२०२० अन्वये लागू राहतील. सर्व उप विभागीय कार्यालया अंतर्गत कार्यरत अंतात्रिक कर्मचाऱ्यांना जे नियम लागु आहेत तेच नियम या कर्मचाऱ्यांना ही लागु राहतील व त्यांना शनिवार व शासकीय सुट्टया मिळण्यास पात्र राहतील.

ग) कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यकांना ३ वर्षानंतर रिक्त असणाऱ्या निम्नस्तर लिपिक (मासं) पदावर कायम स्वरूपी नेमणूक देण्यात येते. परंतु सद्यस्थितीत निम्नस्तर लिपिक (मासं) ही पदे रिक्त नसल्यामुळे अनेक विभागात कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक अनेक वर्षापासून त्याच पदावर कार्यरत आहेत. अशा कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यकांना म.रा.वि.वि.कंपनी मर्यादीत सेवाप्रवेश विनियम २००५ ला सुधार पत्र क्र. ८६ दि.१९.०९.२०२० अन्वये कार्यवाही करण्यात यावी. कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यकांना निम्नस्तर लिपिक (मासं) किंवा निम्नस्तर लिपिक (विवले) या पदामध्ये पदोन्नती देताना कार्यरत परिमंडळात रिक्त पदे उपलब्ध न झाल्यास सहा. व्यवस्थापकीय संचालक/ प्रादेशिक संचालक यांची परवानगी घेऊन लगतच्या परिमंडळ मधील उपलब्ध रिक्त पदावर वळते करण्यात यावे.

घ) कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांना सा.आ. ७४ दि. ३०.०४.१९७४ या आश्वासित या'योजने अंतर्गत लाभ देताना प्रथम लाभ हा निम्नस्तर लिपिक तर दुसरा लाभ हा उच्चस्तर लिपिक व तीसरा लाभ हा मुख्य लिपिक या पदांमध्ये देणे क्रम प्राप्त ठरेल.

३. उपरोक्त मुद्या क्र.२ मध्ये विषद केल्याप्रमाणे आपल्या अखत्यारीत असलेल्या सर्व कनिष्ट कार्यालयीन सहाय्यकांना वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**

१. सहा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).
२. प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. पुणे / नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:-**

१. मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु), म.रा.वि.वि.कं.मर्या. एकलहरे, नाशिक.
२. मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.), म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.
३. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.